Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# गंगाधर शास्त्रीचा खून आणि पेशवे, गायकवाड यांच्यावर झालेल्या आरोपांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. ओमप्रकाश राजाराम फुलबांधे,** एस. चंद्रा महिला महाविद्यालय, साकोली, जि. भंडारा
**प्रा. डॉ. कैलास रामचंद्र भांडारकर,** इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली, जि. गडचिरोली

**सारांश**

पेशवे आणि गायकवाड यांच्यात मतभेद होते. इ. स. १८५३ पासून पेशवे गायकवाड देवाण - घेवाणीचा महत्त्वाचा प्रश्न ऐरणीवर होता. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात देवाण - घेवाणीचा प्रश्न मिटविण्यासाठी इंग्रजांनी मध्यस्थी केली. इंग्रजांच्या संरक्षणात गायकवाड यांचा मुतालिक गंगाधरशास्त्री पटवर्धन इ. स. १८१४ मध्ये पुण्यात आला. परंतु इ. स. १८१५ मध्ये पंढरपूर येथे गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा खून झाला. या खुनामुळे मराठा राज्यसंघात एकच खळबळ माजली. गंगाधरशास्त्री पटवर्धनच्या खुनाचा आरोप पेशवे व गायकवाड या दोन्ही सत्ताधीशांवर केला गेला. इंग्रजांनी शास्त्रीच्या खुनाचा त्र्यंबकजी डेंगळेवर आरोप केला. परंतु गंगाधरशास्त्री पटवर्धनाच्या खुनाचा फायदा पेशवे किंवा गायकवाड यांना झाला नाही. या खुनाचा चिकित्सक तपास केल्यास गंगाधरशास्त्री पटवर्धनाच्या खुनाचा सर्वात जास्त फायदा इंग्रज शासनास झालेला दिसतो. त्यामुळेच पंढरपुरात इंग्रजांनीच मारेकऱ्यांकरवी गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा खून करविला असे म्हणता येईल.

**बिजशब्द :-** ब्रिटीश, सुभा, खून, इतिहासकार, आरोप.

**प्रस्तावना**

ब्रिटिशांच्या आक्रमक व विस्तारवादी धोरणामुळे मराठा राजकारणाला वेगळे वळण लागले होते. इ. स. १८०२ मध्ये इंग्रजांनी पेशवे व गायकवाड या दोन्ही सत्तांना तैनाती फौजेच्या जाळ्यात अडकवून आपली राजकीय व लष्करी बाजू बळकट केली. इ. स. १८११ मध्ये पुण्याच्या रेसिडेन्सीवर कॅ. क्लोजच्या जागी माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टची नेमणूक झाली. त्याच्या कारकिर्दीत इंग्रजांच्या साम्राज्यविस्ताराला जास्तच चालना मिळाली. पेशवे व गायकवाड यांना आपल्यावरील इंग्रज वर्चस्वाची पूर्ण कल्पना आली होती. त्यामुळे पेशवे व गायकवाड इंग्रजांचे वर्चस्व झुगारून देण्याचा प्रयत्न करू लागले. पेशव्याने इ. स. १८१४ मध्ये शिंदे, भोसले व होळकर याचे सहकार्य मिळविण्याकरिता आपले दूत त्यांच्याकडे रवाना केले होते. तसेच सहकार्य गायकवाडांकडूनही मिळविण्याचा प्रयत्न पेशव्याचा होता.

बडोदा दरबारातही ब्रिटिशविरोधी गट पेशव्याला येऊन मिळण्यास उत्सुक होता. बडोदा संस्थानात इंग्रजांचे वर्चस्व दिवसेंदिवस वाढत होते. परंतु गंगाधरशास्त्री पटवर्धन या इंग्रज धार्जिण्या बडोद्याच्या दिवाणामार्फत इंग्रजांना बडोद्यातील हालचाली कळत होत्या. त्यामुळे बडोद्यातून गंगाधरशास्त्री पटवर्धन याला बाहेर काढण्याची संधी बडोद्यातील इंग्रजविरोधी मंडळी पाहत होते. पेशवे आणि गायकवाड यांच्यात आर्थिक देवाण घेवाणीचा मुद्दा समोर आलेला होता. यांच्यातील मतभेद इंग्रजांच्या मध्यस्थीने मिटविण्याचे इ. स. १८०२ च्या वसईच्या करारात ठरले होते. हे मतभेद सोडविण्यास आलेल्या गंगाधरशास्त्री पटवर्धनाचा पंढरपुरात खून झाला. या खुनास जबाबदार कोण? ते शोधून पेशवे -


Copyright © | JET Network, All Rights Reserved

गायकवाड या सत्तांवर खुनाचा कोणता परिणाम झाला या दृष्टिकोणातून हे संशोधनकार्य करण्यात आले आहे.

**गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचा पंढरपूर येथे खून**

पेशवे व गायकवाड यांच्यातील आर्थिक व्यवहाराचा पेच सुटायला बराच कालावधी लागला होता. तसेच इ. स. १८०४ पासून गुजरातमधील अहमदाबाद सुभा गायकवाडांकडे भाडेपट्टीने देण्यात आला होता. इ. स. १८१४ मध्ये त्याची मुदत संपणार होती (सावळे २०१९). त्यामुळे पेशव्यांना अहमदाबाद सुभा परत द्यावयाचा होता. अहमदाबाद सुभा गायकवाडांकडेच राहावा असे इंग्रजांना वाटत होते. शेवटी इ. स. १८१४ मध्ये अहमदाबादची वहिवाट पेशव्यांना परत मिळाली. पेशव्याने अहमदाबाद सुभ्यावर त्रिंबकजी डेंगळेची नेमणूक केली. तसेच इ. स. १८०२ पासून पेशवे व गायकवाड यांच्यातील देण्याघेण्याचा प्रश्न इ. स. १८११ पर्यंत पूर्णपणे मिटलेला नव्हता. इ. स. १८११ मध्ये पेशवे आणि गायकवाड यांनी एकमेकांवर थकबाकी असल्याची दाखविलेली होती. त्यामुळे इ. स. १८११ मध्ये आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी बापू मैराळ याला बडोद्यावरून पुण्याला पाठविण्यात आले होते. परंतु दोन वर्षेपर्यंत तो प्रश्न सोडवू शकला नव्हता. त्यामुळे इ. स. १८१४ मध्ये गायकवाड व इंग्रज यांनी गंगाधरशास्त्री पटवर्धन याला 'मुतालिक' हे पद देऊन पुण्याला पाठविले.

गंगाधरशास्त्री ब्रिटिशधार्जिणा असल्यामुळे पेशव्यांनी त्याची भेट सुद्धा घेतली नाही. परंतु पेशव्यांचा मंत्री त्रिंबकजी डेंगळे याने गंगाधरशास्त्रीची भेट घेऊन चर्चा केली आणि त्याला पेशव्यांच्या बाजूला वळवून घेतले. आणि पेशव्याच्या मेहुणीचा विवाह गंगाधरशास्त्रीच्या मुलासोबत निश्चित करण्यात आला. गंगाधरशास्त्रीने पेशवे व गायकवाड यांच्यातील आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो प्रश्न सुटला नाही. उलट इ. स. २० जुलै १८१५ रोजी गंगाधरशास्त्रीची पंढरपूर येथे हत्या झाली. अशारीतीने पेशव्यांचे स्नेही, व्याही व दिवाण अशा एकापेक्षा एक वरचढ पायऱ्या चढण्याचा योग गंगाधरशास्त्रीला आला असताना दुर्दैवाने सगळाच खेळ संपुष्टात आला. वास्तविक शास्त्रीच्या जीविताची हमी इंग्रजांनी घेतली होती. इंग्रजांच्या मध्यस्थीने आलेल्या वकिलाचा खून झाला, याचा इंग्रजांना फार राग आला. इंग्रजांनी खुनाचा आरोप त्रिंबकजीवर ठेवून पेशव्यांवर त्रिंबकजीला अटक करण्यासाठी दडपण आणले. तेव्हा पेशव्याने त्रिंबकजीला प्रथम स्वतःच्या कैदेत ठेवले, पण नंतर इंग्रजांनी प्रत्यक्ष पेशव्यांनाच धमकी दिल्यामुळे पेशव्यांना त्रिंबकजीला इंग्रजाच्या स्वाधीन करावे लागले. इ. स. १९ सप्टेंबर १८१५ ला कॅप्टन व्हिक्स याने त्रिंबकजीला ठाण्याच्या किल्यात कैदेत ठेवले. गंगाधरशास्त्रीच्या खुनामुळे पेशवे व गायकवाड या दोघांच्याही दरबारात गोंधळ निर्माण झाला. गंगाधरशास्त्री पटवर्धन याचे संबंध इंग्रज, बडोद्याचे गायकवाड आणि पेशवे या तिघांसोबतही होते. इंग्रजांनी त्रिंबकजीवर संशय घेऊन त्याला अटकेत ठेवले. दुसरे बाजीराव पेशवे व बडोद्याचे माजी दिवाण सीताराम यांना त्या खुनाकरीता अप्रत्यक्ष जबाबदार धरले.

**गंगाधरशास्त्रीच्या खुनाची जबाबदारी - पेशव्यांवर आरोप**

ग्रँट डफ व इलियट यासारखे इतिहासकार गंगाधरशास्त्रीच्या खुनाचा पेशव्यांवर आरोप लावतात. पेशव्यांवर आरोप लावताना ते पुढीलप्रमाणे कारण सांगतात. गंगाधरशास्त्री पेशव्यांच्या बाजूला वळले होते. त्यांच्यातील मैत्री नातेसंबंधात दृढ व्हावी या हेतूने शास्त्रीच्या पुत्राशी पेशव्यांच्या मेहुणीचा विवाह निश्चित करण्यात आला होता. नाशिक येथे समारंभाची सर्व तयारी झाली असताना गंगाधरशास्त्री यांनी मात्र हा विवाह ऐनवेळी रद्द केला. लग्न समारंभ रद्द झाल्यामुळे पेशव्याला त्याचा राग आला. तसेच


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

शास्त्रीच्या पत्नीला बाजीरावाच्या पत्नीकडून भेटीस बोलावणे आले, तेव्हा गंगाधरशास्त्रीने बाजीरावाची दृष्टी पापी आहे म्हणून आपल्या पत्नीला वाड्यात पाठविले नाही. या घटनेमुळे पेशवा व त्रिंबकजी हे सुडाने प्रेरित होऊन शास्त्रीच्या हत्येचा कट रचला, असे इतिहासकार सरदेसाई याचेही मत आहे.

परंतु त्यावेळच्या एलफिन्स्टनच्या पत्रातून पेशव्यावर कोणताही आरोप केला गेला नसल्याचेच लक्षात येते. पेशव्यांच्या दुराचाराबद्दल एलफिन्स्टनच्या तोपर्यंतच्या लिखाणात कुठेही आणि कुठलाही उल्लेख नाही. एलफिन्स्टनला पेशव्यांबद्दल पुसटशी शंका जरी असती, तरी त्याने पेशव्यांविरोधात पुरावा पुढे मांडून पेशव्यांवर कारवाई केली असती. निदान गव्हर्नर जनरलला तरी तसे कारवाईबद्दल कळविले असते. (सावळे २०१९)

इतिहासकार ग्रँट डफ याने पेशव्यांवर दुसरा आरोप केला की, गंगाधरशास्त्रीची हत्या झाली त्या रात्री पेशवा देवळाच्या वरच्या वऱ्हाड्यात बसून गंगाधरशास्त्रीच्या खुनाचा देखावा प्रत्यक्ष बघत होता. परंतु ही माहिती डफला कशी मिळाली? हा प्रश्न निरुत्तरीत आहे. मुळात बापू मैराळ यांनी तर ही माहिती दिलीच नाही. याउलट बापू मैराळ यांनी असे लिहून पाठविले होते की, त्रिंबकजीने दुसऱ्यांदा निरोप दिला की पेशवा दुसऱ्या दिवशी सकाळी देवळात जाणार आहे. तेव्हा भेटण्याची संधी द्यावी. यावरून हे सिद्ध होते की, बापू मैराळने ही माहिती दिली नाही. डफला ही चुकीची माहिती बाळाजीपंत नातू यांच्याकडून कळली. ती त्याच्याकडून वदवून घेण्यात आली व लिहिण्याचे कामही बाळाजीपंत नातू यानेच केले होते. पेशव्यांवरील आरोपाला काही तथ्य नव्हते, हे खालील पुराव्यांवरून सिद्ध होते.

- पेशव्यावर गंगाधरशास्त्रीच्या खुनाचा आरोप गंगाधरशास्त्रीच्या नातेवाईक व स्नेही यांनी केलेला नाही.
- गंगाधरशास्त्रीचा बालपणीचा मित्र व व्याही प्रभाकर तात्या (शाहीर) यानेही पेशव्यांवर शास्त्रीच्या खुनाचा आरोप केलेला नाही. शास्त्री व प्रभाकर तात्या यांचा स्नेहसंबंध शेवटपर्यंत कायम होता. गंगाधरशास्त्रीच्या पुत्रास (आबासाहेब) प्रभाकर तात्याची कन्या दिलेली होती. गंगाधरशास्त्रीच्या खुनात बाजीराव यांचा संबंध असता, तर त्यांनी आपल्या काव्यातून निःसंशय उल्लेख केला असता. या खुनाचा उल्लेख त्यांच्या काव्यात आहे, परंतु त्यात त्यांनी पेशव्याला जबाबदार धरलेले नाही. याउलट बाजीरावाला निरूपाय होऊन त्रिंबकजीला इंग्रजांच्या स्वाधीन करावे लागले असे काव्य त्याने केले होते. (भावे १९९२)
- तसेच गंगाधरशास्त्री पटवर्धन यांची कन्या गं. भा. श्रीमती यमुनाबाई यांनीही बाजीरावावर शास्त्रीच्या हत्येचा आरोप केलेला नाही. (Colebrook 1884)
- गंगाधरशास्त्रीच्या वंशजांची कैफियत बडोदे सरकारच्या हुजूर कचेरीत तयार होऊन छापल्या गेली आहे. त्यातही शास्त्रीच्या खुनाविषयी लिहिले जातांना पेशवा, त्रिंबकजी किंवा गायकवाड यांचे नाव घेतले गेलेले नाही. इतकेच नव्हे, तर त्यातील एकंदर माहितीवरून शास्त्रीचा घात करण्याची योजना पेशव्यांची नसून त्या घटनेकरीता ते जबाबदार धरले जाऊ शकत नाहीत हे स्पष्ट होते.

**गंगाधरशास्त्रीच्या खुनाकरीता गायकवाड जबाबदार - आरोप**

डॉ. पी. सी. गुप्ता यांनी आपल्या संशोधन ग्रंथात गंगाधरशास्त्रीच्या खुनाकरीता पेशवे किंवा त्रिंबकजी जबाबदार नसून शास्त्रीच्या खुनाकरीता बडोद्याचे गायकवाड जबाबदार आहेत, असे विचार मांडले आहेत. त्याकरिता त्यांनी खालील मुद्दे पुरावा म्हणून मांडले आहेत.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

- बडोद्याच्या गायकवाड यांच्या दरबारात इंग्रजाचे वर्चस्व वाढले होते. इंग्रजांच्या वर्चस्वासोबतच ब्रिटिश विरोधी गटाचे पुढारीपण आनंदराव महाराजाची पत्नी राणी तक्ताबाई, गोविंदराव महाराजांची विधवा पत्नी गहनाबाई व पदच्युत दिवाण सीताराम रावजी यांच्याकडे होते. यांचा बडोद्यात ब्रिटिश विरोधी कट सुरु होता. सीताराम फत्तेसिंग महाराजांच्या अटकेत होता. गायकवाडाने खुनानंतर सीतारामला सोडविण्याचा प्रयत्न केला.
- भगवंतराव व गोविंदराव बंधूजी यांचे गायकवाड मंडळींच्या पाठिंब्याने ब्रिटिश विरोधात पेशव्यांची मदत मिळविण्याचे प्रयत्न सुरू होते. शास्त्री हा ब्रिटिशधार्जिणा असल्यामुळे त्यांच्या मार्गातील अडचण होता. शास्त्रीच्या खुनानंतर गोविंदराव बंधूजी बापू मैराळच्या सैनिकांना बंड करण्यासाठी प्रोत्साहन देत होता. शास्त्रीच्या खुनानंतर ब्रिटिशांनी सीतारामला इंग्रजांच्या स्वाधीन करण्यास फत्तेसिंगला कळविले. परंतु फत्तेसिंग गायकवाड सीतारामला इंग्रजांच्या ताब्यात देण्यास टाळाटाळ करीत होता.

वरील तीनही मुद्दे शास्त्रीच्या खुनाकरीता गायकवाड जबाबदार होते हे सिद्ध करू शकत नाहीत. बडोद्यातील इंग्रज विरोधी गट इंग्रजांच्या वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी पेशव्यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. एलफिन्स्टनला गायकवाडाच्या ब्रिटिशविरोधी कारवाया चिरडून टाकायच्या होत्या. त्यामुळे एलफिन्स्टनने गंगाधरशास्त्रीची हत्या सीताराम व गोविंदराव बंधूजी यांनी केली असा आरोप केला. एलफिन्स्टनने हा आरोप त्याच्या हेरांकडून हाती आलेल्या पत्रांवरून केलेला आहे.

**निष्कर्ष**

पेशवे हे अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे व पापभीरू होते. नारायणरावाच्या खुनाने डागलेला व नारायणरावाच्या काल्पनिक पिशाड्याच्या भीतीने पूर्ण पछाडलेला बाजीरावासारखा धर्मभोळा मनुष्य पंढरपूरसारख्या पवित्र क्षेत्रात एका ब्राम्हणाची हत्या घडवून आणेल असे बिलकूल संभवनीय नाही. नारायणरावाच्या आत्म्याला शांती लाभावी म्हणून त्यांनी पुण्याच्या सभोवताल आंब्याची झाडे लावली, ब्राम्हणांना दक्षिणा देऊन जेवू घातले. इतके ते पापभीरू होते. मुळात त्या काळात ब्रम्हहत्या हे पाप समजल्या जात होते. पंढरपूरसारख्या पवित्र स्थळी उच्चकुलीन ब्राम्हणाचा पेशवे खून करतील हे शक्य वाटत नाही. पेशव्यांना शास्त्रीचा खून करायचा असता तर आडवाटेवर कोठेही केला असता. त्याला पंढरपूरसारख्या पवित्र क्षेत्रातच ही हत्या घडवून आणण्याची गरज नव्हती. एका हत्येचे (नारायणराव) प्रायश्चित म्हणून पेशवा पाण्यासारखा पैसा खर्च करीत होता आणि त्यासाठी पंढरपूरला नित्यवारी करीत होता. तेव्हा बाजीराव दुसरा हा ब्राम्हणाची हत्या करील व तीही पंढरपूर सारख्या पवित्र ठिकाणी करील हे अशक्य आहे.

वास्तविक इ. स. १८१५ मध्ये पेशव्याला शास्त्रीची हत्या करण्याचे काही कारण नव्हते. ज्यावेळी शास्त्री गायकवाडाचा मुतालिक म्हणून खंडणी संबंधित बोलणी करण्याकरीता पुण्याला आला, तेव्हा पेशव्यांचा शास्त्रीवर राग होता. त्यावेळी शास्त्रीच्या हत्येचा विचारही त्यांच्या मनात आला नाही. असे असताना इ. स. १८१५ मध्ये शास्त्री पेशव्यांच्या बाजूला वळलेला होता. शास्त्रीच्या कर्तबगारीचा व त्याच्या गुणांचा फायदा मराठा राज्याकरीता करवून घेण्याकरीता शास्त्री जिवंत असणेच पेशव्यांच्या फायद्याचे होते. म्हणूनच पेशव्यांनी शास्त्रीच्या संरक्षणाची व्यवस्था केली होती. पेशव्यांचे शास्त्रीबद्दल विरोधाचे कारण केवळ ठरलेला विवाह रद्द केला हे होते. परंतु याकरीता पेशवे शास्त्रीची हत्या घडवून आणणार नाही. त्यामुळे यावरुन पेशव्यावरील आरोपात काहीही तथ्य नाही, हे येथे सिद्ध होते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**आधार ग्रंथ सूची**

१. आठल्ये वि., 'आधुनिक भारताचा इतिहास १७६० – १९५०', अंशुल पब्लिकेशन, प्रथमावृत्ती, २००४, पृ. १२२.
२. कोलारकर श. गो., 'मराठ्यांचा इतिहास: शिवयुग ते मराठेशाहीच्या अस्तापर्यंत (१६०० - १८१८), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती, २००९, पृ. ४८८.
३. चिटणीस गो. के., 'राज्यकर्ते गायकवाड: काही ऐतिहासिक प्रसंग', १८८५, पृ. २३३.
४. चाफेकर ना. गो., 'पेशवाईच्या सावलीत', १९३७, पृ. १८.
५. भावे वि. ल., 'मराठी दप्तर रूमाल दुसरा', १९२२, पृ. २१.
६. डॉ. वैद्य सुमन, 'अखेरचा पेशवा', १९९४, पृ. १९५.
७. सावळे एस. उ., 'त्रिंबकजी डेंगळे व्यक्ती आणि कार्य: एक मुल्यमापन', सुविचार प्रकाशन मंडळ (ऑफसेट छपाई विभाग), नागपूर, पहिली आवृत्ती, २०१९, पृ. १०५.
८. Basu Maj, 'Rise of the Christian Power in India', 1931, Page 687.
९. Colebrook. Lie of Elphinstone, Vol. – I, P. 296, 1884.
१०. Duff Grant, 'History for Maratha', III 375.
११. Elliot E. A. H., 'Rulers of Baroda', P. 114.
१२. Malcom J., 'Political History of India', I. 275.
१३. Elliot E. A. H., 'Gazetteer of the Bombay Presidency Board', 1883, P. 222.


Copyright © | JET Network, All Rights Reserved